भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या माध्यमिक आश्रमशाळेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या १४ पदांना मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन निर्णय क्रमांकः विभशा २०१५/प्र.क्र.२८४/विजाभज-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

तारीख: ०७ मे , २०१८

वाचा :-

शासन निर्णय क्र. विभशा २०१५/प्र.क्र.२८४/विजाभज-२, दि. १ डिसेंबर २०१६

प्रस्तावना:-

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक आश्रमशाळेस जोडून निवासी माध्यमिक आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदासह **"विशेष बाब"** म्हणून मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावास दि. २५.१०.२०१६ च्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार विभागाने दि. १ डिसेंबर,२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या निवासी माध्यमिक आश्रमशाळेसाठी सदर शासन निर्णयातील परि.२ नुसार एकूण १४ नवीन पदांना उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.मंत्रीमडळाने दि. २५.१०.२०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या माध्यमिक आश्रमशाळेतील एकूण १४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदांच्या पदांना शासन मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक आश्रमशाळेस जोडून निवासी माध्यमिक आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदासह **"विशेष बाब"** म्हणून मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावास दि. २५.१०.२०१६ च्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विभागाच्या दि. १ डिसेंबर,२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत माध्यमिक आश्रमशाळा सुरु असल्याने या शाळेमध्ये सध्या कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्या पदाची अर्हता व इतर अटी व शर्ती पूर्ण करीत असतील तर त्यांचे उपरोक्त पदांमध्ये समायोजन करून मा.मंत्रीमंडळाने मान्य केलेली खालीलप्रमाणे १४ पदे भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	**विजाभज आश्रमशाळा /पद**	**पदसंख्या**
अ)	**माध्यमिक विजाभज आश्रमशाळा**	
१)	मुख्याध्यापक	१
२)	शिक्षण सेवक	४
३)	कनिष्ठ लिपिक	१
४)	प्रयोग शाळा परिचर	१
५)	शिपाई	३
६)	वसतिगृह महिला अधिक्षक	१
७)	स्वयंपाकी	१
८)	मदतनीस	१
९)	कामाठी	१
	एकूण	**१४**

संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील १४ पदांना शासन नियमानुसार संबंधित कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व आरक्षण विषयक धोरण विचारात घेउन वैयक्तीक मान्यता देण्याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी शिफारसींसह वैयक्तीक मान्यतेचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावे.

सदर माध्यमिक आश्रमशाळेसाठी वेतन व वेतनेतर बाबींकरीता लागणाऱ्या वार्षिक रू.४०.०७ लक्ष एवढ्या खर्चास (वेतन अनुदान रू. २६.४३ लक्ष व वेतनेतर अनुदान रू. १३.६४ लक्ष परिपोषण अनुदान व इतर सादिल खर्चासह) लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण,२७७-शिक्षण,(०१) विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (०१) विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्यासाठी आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम) (दत्तमत) (२२२५ई८६६) या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने विशेष बाब म्हणून मंजुरी दिल्यामुळे निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१८०५०७१७२९३४२८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.05.07 17:33:16 +05'30'

(भा. र. गावित)
सह-सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग.
६. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. धर्मदाय आयुक्त अमरावती विभाग.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
१०.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग अमराती
११.सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण उस्मानाबाद
१२.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
१३.अध्यक्ष / सचिव भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद
१४.निवड नस्ती (विजाभज-२)